# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 31/08/2021 (मंगळवार)
(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावरील सरस्वती नगर काटोल येथे दिनांक 28/08/2021 चे 20.00 वा. ते दिनांक 30/08/2021 चे 09.30 वा. फिर्यादीची बहिण सौ छाया रवि राठोड, रा. काटोल हि आपल्या परिवारासह गुजरात येथे घराला कुलूप लावुन गेली व तिचे घरी किरायाने राहणारा प्रशांत सुद्धा घटना वेळी हा नागपुरला गेला होता. दि. 30/08/21 रोजी सकाळी 09:30 वा. दरम्यान बॅक मॅनेजर हा नागपुर वरून रूमवर येवुन फिर्यादीला फोन करून सांगितले की, 'तुमच्या बहीणीचे घराचे दाराचे कडी तोडुन कुलूप खाली पडलेले आहे. अशा फोनवरून फियादी हे त्यांच्या बहिणीच्या घरी जावुन पाहीले असता दाराचे कडी तोडुन कुलूप खाली पडलेले दिसले. तसेच दार उघडुन आत मध्ये पाहणी केली असता दोन्ही लोखंडी सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. तेव्हा बहिणीला फोन करून विचारले की, घरी कुठे काय ठेवले आहे यावरून तिने स्टोर रूममध्ये ड्रमवर ठेवलेली लोखंडी पेटीतील लाल पर्समध्ये ठेवलेले सोन्या–चांदिचे दागिने व नगदी 50,000/–रू. असा एकुण कि. 97,250/– रू. चा मुद्देमाल चोरी गेल्याचे दिसून आले. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने दाराचे कडी कुलूप तोडुन सदर माल चोरी करून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विनोद मोहनसिंग परमाल, वय 53 वर्ष, रा. धर्म शाळेजवळ यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री लभाने 9823433863 हे करीत आहे.

### चोरी

1) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावरील बस स्टाप मौदा येथे दिनांक 30/08/2021 चे 13.15 वा. फिर्यादी नामे– सौ. राजश्री विवके लके वय 25 वर्ष रा. मांढळ ता कुही या रक्षाबंधन करून आपल्या गावी भंडारा येथुन बस ने मांढळ येथे जात असता सोबत असलेल्या हॅडबॅग मधील एक मंगळसुत्र किमती 80,000/–रू. व दोन सोन्याच्या अंगठया किमती 28,000/–रू. असा एकुण कि. 1,08,000/–रु. चे सोन्याचे दागिने होते. बस मधिल गर्दीचा फायदा घेवुन आरोपी 1) सौ. मिना नसाद अन्सारी, 2) सौ. रेखा मंगल लोंडे, 3) ग.भा. शालु राजा लोंडे, 4) सौ. सारीका कुमार लोंडे, 5) सौ. लक्ष्मी विरू लोंडे व 6) सौ. पुजा परवीन लोंडे सर्व रा. रामेश्वरी रिंग रोड नागपुर यांनी संगनमत करून फिर्यादीच्या बॅगमधुन दागिने चोरी करतांनी बस मधील एका महीलेने बघीतले. तेव्हा आरोपीतांची चेकींग केली असता त्यांच्याकडे फिर्यादीचे दागिने मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार कुथे मो 9764007720 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 04 कि. मी. अंतरावरील नांदा शिवार पाईप लाईन रोडवर खापा बार ॲण्ड रेस्टॉरेन्ट येथे दिनांक 30/08/2021 चे 03.00 वा. ते 04.00 वा. फिर्यादी नामे– विलास उमाशंकर उकोने वय 36 वर्ष रा वार्ड क्र 16 पहलेपाल यांचे खापा बियर बार ॲण्ड रेस्टॉरेन्टचे दाराचे अज्ञात आरोपीने कुलुप तोडुन बियरबार मधील विदेशी दारू कि. 16,755/–रू. चा माल व नगदी 1,500/–रू. असा एकुण कि. 18,255/–रू. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 461, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नावेद खान मो. नं. 8208511663 हे करीत आहे.

3) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 05 कि. मी. अंतरावरील नांदा नंदकिशोर पेट्रोल पंप समोर डब्ल्युसी एल उमरेड डब्ल्युसीएल गेटसमोर उमरेड येथे दिनांक 08/08/2021 चे 02.23 वा. ते दिनांक 22/08/2021 चे 08.20 वा. फिर्यादी नामे– राकेशसिंग जितेंद्रसिंग बैस वय 36 वर्ष रा मोहोड ले आउट नारायण सीटी उमरेड यांच्या मालकीचा टाटा ट्रक क्र. एमएच –29/टी– 0657 कि. 8,30,000/–रू. चा मौजा डब्ल्यु. सि. एल. उमरेड येथील पेट्रोलपंप जवळुन अज्ञात आरोपीने चोरून नेले. तसेच राजेंद्र भद्रसेन शर्मा रा. वायगांव घोटुर्ली यांचे मालकीचा टाटा क्र ट्रक क्र. एमएच 31 एपी/3607 किमती 2,50,000/–रू चा असा एकुण 10,80,000/–रू. चे दोन्ही ट्रक अज्ञात आरोपीने डब्ल्यु सी.एल. उमरेड गेट समोरून चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री पांडे 9763707984 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर